**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**

**सभावृत्तांत**

**कार्यपत्रिका क्र. ४**

दिनांक :- १९/०६/२०१३ वेळ :- दु. १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १९/०६/२०१३ रोजी दु. १२.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. पवार यमुनाताई रमणनाना | अध्यक्षा |
| २. | मा. तरस बाळासाहेब जयवंत | सदस्य |
| ३.. | मा. भोंडवे संगिता राजेंद्र | सदस्य |
| ४. | मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव | सदस्य |
| ५. | मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर | सदस्य |
| ६. | मा. लोंढे गणेश नारायण | सदस्य |
| ७. | मा. शमीम पठाण | सदस्य |
| ८. | मा. †›.चिंचवडे संदिप गुलाबराव | सदस्य |
| ९. | मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन | सदस्य |
| १० | मा. डोके अपर्णा निलेश | सदस्य |
| ११. | मा. को-हाळे अनंत सुभाष | सदस्य |
| १२ | मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख | सदस्य |
| १३. | मा. शेट्टी प्रसाद | सदस्य |
| १४ | मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन | सदस्य |
| १५ | मा. मासुळकर समीर मोरेश्वर | सदस्य |
| १६. | मा. पालांडे सुजाता सुनिल | सदस्य |
| १७. | मा. पानसरे अमिना मोहंम्मद | सदस्य |
| १८. | मा. साबळे छाया जगन्नाथ | सदस्य |
| १९. | मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव | सदस्य |
| २०. | मा. ओव्हाळ शेखर अशोक | सदस्य |

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रभाग अधिकारी अजीज कारचे, मा. कार्य. अभियंता रविंद्र दुधेकर, शरद जाधव, रामदास जाधव, वसंत काची, जयंत बरशेट्टी, (प्रशासन अधिकारी) सुरेश आव्हाळे लेखाधिकारी, उपअभियंता, बागलाणे संजय, डी. एन. गट्टूवार, सी.बी. कोंडे, के. डी. फुटाने, व्ही.एन.देसले, के.एस. महाजन, संजय घुबे, श्रीम. मोमीन, प्र.अ. घोडे, सहा. आरोग्याधिकारी, जे.एस. जानकर, सहा. उद्यान अधि. जी. आर.गोसावी, गायकवाड डी.एन., पशुवैद्यकिय - आर. एन भाट, इत्यादी.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष मा. पवार यमुनाताई रमणनाना यांनी उपस्थितांचे स्वागत केले. व सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

दि. १५/५/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र. ३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**उपस्थित सन्मा सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र. १ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र.२२ चिंचवड गांवठाण येथे महासाधू श्री मोरया गोसावीमंदिरालगत पवना काठी दशक्रिया विधी घाट व पवना नदीमध्ये असलेला बंधारा या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून हायमास्ट दिवे बसविणेबाबत.

विषय क्र. २ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र.२२ चिंचवड गांवठाण येथे महासाधू श्री मोरया गोसावीमंदिरालगत पवना काठी दशक्रिया विधी घाट या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून व स्वच्छतेच्या दृष्टीकोनातून सुरक्षारक्षक व सफाई कर्मचारी नेमणेबाबत.

विषय क्र. ३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र.२२ चिंचवड गांवठाण येथे धनेश्वर पुलालगत पवना नदीमध्ये नागरिकांनी निर्माल्य टाकू नये याकरीता पुलाचे दोन्ही बाजूस फॅब्रीकेशन मध्ये चेनलिंक अथवा जाळया बसविणे बाबत.

विषय क्र. ४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. २२ चिंचवड गांवठाणमध्ये पर्यावरण विषयक जनजागृती करणेकरीता शैक्षणिक व सामाजिक संस्था पवना एज्यूकेशन व सोशल ट्रस्ट आणि जय गणेश ग्रुप सोशल ऑर्गनायझेशन यांचे माध्यमातून जनजागृती फलकांद्वारे पर्यावरण विषयक जागृती करणेकरीता परवानगी मिळणे बाबत.

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक-मा.तरस बाळासाहेब जयवंत अनुमोदक-मा.†>.चिंचवडे संदिप गुलाबराव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी नगरसेवक श्री. दामोदर गव्हाणे, श्री. राजेद्र काळे, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व शिवसेना गटनेते मा. श्रीरंग बारणे यांचे वडील श्री. चंदू मल्हारी बारणे, हवेली पंचायत समिती सदस्या व मा. सुमन नेटके यांच्या सासुबाई श्रीमती. गंगुबाई नेटके तसेच उद्योजक श्री. राजन नथु साबळे यांचे दु:खद निधन झाले असल्याने त्यांस श्रध्दांजली वाहुन बुधवार दिनांक १७/७/२०१३ रोजी स. ११.४५ पर्यंत सभा तहकुब करण्यात यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

मा. अध्यक्षा - बुधवार दि. १७/७/२०१३ रोजी स. ११.४५ वा. पर्यत सभा तहकूब करणेत येत आहे.

सही/-
[ पवार यमुनाताई रमणनाना ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**

**सभावृत्तांत**

**( दि. १९/०६/२०१३ ची तहकूब सभा )**

**कार्यपत्रिका क्र. ४**

दिनांक :- १७/०७/२०१३ वेळ :- दु. ११.४५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची **दि. १९/०६/२०१३ ची तहकूब सभा** बुधवार दिनांक १७/०७/२०१३ रोजी दु. ११.४५ वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. पवार यमुनाताई रमणनाना | अध्यक्षा |
| २. | मा. नेटके सुमन राजेंद्र | सदस्य |
| ३. | मा. तरस बाळासाहेब जयवंत | सदस्य |
| ४. | मा. भोंडवे संगिता राजेंद्र | सदस्य |
| ५. | मा. मोरेश्वर महादू भोंडवे | सदस्य |
| ६. | मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव | सदस्य |
| ७. | मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर | सदस्य |
| ८. | मा. शमीम पठाण | सदस्य |
| ९. | मा. †>.चिंचवडे संदिप गुलाबराव | सदस्य |
| १०. | मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन | सदस्य |
| ११. | मा. को-हाळे अनंत सुभाष | सदस्य |
| १२. | मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख | सदस्य |
| १३ | मा. गावडे जयश्री वसंत | सदस्य |
| १४. | मा. साळुंके सविता सुरेश | सदस्य |
| १५. | मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन | सदस्य |
| १६ | मा. मासुळकर समीर मोरेश्वर | सदस्य |
| १७. | मा. पालांडे सुजाता सुनिल | सदस्य |
| १८. | मा. पानसरे अमिना मोहंम्मद | सदस्य |
| १९. | मा. मंचरकर गिता सुशिल | सदस्य |
| २०. | मा. कदम कैलास महादेव | सदस्य |
| २१. | मा. साबळे छाया जगन्नाथ | सदस्य |
| २२. | मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव | सदस्य |
| २३. | मा. ओव्हाळ शेखर अशोक | सदस्य |

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रभाग अधिकारी अजीज कारचे, मा. कार्य. अभियंता रविद्र दुधेकर, शरद जाधव, रामदास जाधव, वसंत काची, जयंत बरशेट्टी, प्रशासन अधिकारी शांताराम राऊत, लेखाधिकारी सुरेश आव्हाळे, उपअभियंता, बागलाणे संजय, डी. एन. गट्टूवार, सी.बी. कोंडे, के. डी. फुटाणे, व्हि. जी कांबळे, व्ही.एन.देसले, के.एस. महाजन, संजय घुबे, श्रीम. मोमीन, एम.एम.चव्हाण सहा. आरोग्याधिकारी, जे.एस. जानकर, उद्यान चांदेरे आर. बी. पशुवैद्यकिय डॉ. गोरे इत्यादी.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष मा. पवार यमुनाताई रमणनाना यांनी उपस्थितांचे स्वागत केले. व सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

ठराव क्र. २६ | विषय क्र. १
दि. १७/०७/२०१३ | विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक: मा. अश्विनी गजानन चिंचवडे | अनुमोदक: मा. †>.चिंचवडे संदिप गुलाबराव

संदर्भ : मा. अश्विनी गजानन चिंचवडे यांचे दि. १९/०६/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

चिंचवड येथे प्रभाग क्र. २२ चिंचवड गांवठाणमध्ये महासाधू श्री. मोरया गोसावी मंदिरालगत पवना नदी काठी दशक्रिया विधी घाट येथे व तेथून जवळच असलेल्या पवना नदीमध्ये पाटबंधारे खात्याने उभारलेला बंधारा या ठिकाणी सध्या रात्रीच्या वेळी पुरेसा प्रकाश देणारे दिवे नसल्याने अपघात अथवा कोणताही अनुचित प्रकार घडल्यास मदतीकरीता प्रखर प्रकाश नसल्याने मदतीमध्ये अडचण निर्माण होते.

तरी पवना दशक्रिया विधी घाट व पवना नदीमधील बंधारा या ठिकाणी रात्रीच्या वेळी सुरक्षितेच्या दृष्टीकोनातून प्रखर प्रकाश असणारे हायमास्ट दिवे व विजेचे खांब बसविण्यास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. २७ | विषय क्र. २
दि. १७/०७/२०१३ | विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक: मा. अश्विनी गजानन चिंचवडे | अनुमोदक: मा. †>.चिंचवडे संदिप गुलाबराव

संदर्भ : मा. अश्विनी गजानन चिंचवडे यांचे दि. १९/०६/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

चिंचवड येथे प्रभाग क्र. २२ चिंचवड गांवठाणमध्ये महासाधू श्री. मोरया गोसावी मंदिरालगत पवना नदी काठी दशक्रिया विधी घाटाचे दुरुस्तीचे व सुशोभिकरणाचे काम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने हाती घेतले असून सदरचे काम अंतिम टप्प्यात आहे.

याठिकाणी नागरी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून पूर्णवेळ सुरक्षारक्षक नेमण्यात यावेत तसेच परिसर स्वच्छ ठेवण्याकरीता सफाई कर्मचा-यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. २८ | विषय क्र. ३
दि. १७/०७/२०१३ | विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक: मा. अश्विनी गजानन चिंचवडे | अनुमोदक: मा. †>.चिंचवडे संदिप गुलाबराव

संदर्भ : मा. अश्विनी गजानन चिंचवडे यांचे दि. १९/०६/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

चिंचवड येथे प्रभाग क्र. २२ चिंचवड गांवठाणमध्ये धनेश्वर पुलाचे रंगरंगोटीचे व सुशोभिकरणाचे काम सुरु आहे. याठिकाणी पुलावरुन अनेक नागरिक निर्माल्य नदीमध्ये टाकत असतात. त्यामुळे पवना नदीच्या प्रदुषणामध्ये वाढ होते. त्याकरीता पुलाच्या दोन्ही बाजूला फॅब्रीकेशनमध्ये चेनलिंक अथवा जाळया बसविण्यात याव्यात म्हणजे पवना नदीचे पावित्र्य राखणे शक्य होईल. सदर ठिकाणी पुलाच्या दोन्ही बाजूला फॅब्रीकेशनमध्ये चेनलिंक अथवा जाळया बसविण्यास मान्यता देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. २९ | विषय क्र. ४
दि. १७/०७/२०१३ | विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक: मा. अश्विनी गजानन चिंचवडे अनुमोदक: मा. †>.चिंचवडे संदिप गुलाबराव

संदर्भ : मा. अश्विनी गजानन चिंचवडे यांचे दि. १९/०६/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

चिंचवड येथे प्रभाग क्र. २२ चिंचवड गांवठाण पवना एज्युकेशन व सोशल ट्रस्ट आणि जय गणेश सोशल ऑर्गनायझेशन या सामाजिक संस्थांच्या माध्यमातून प्रभागातील नागरिकांमध्ये पर्यावरण विषयक जागृती निर्माण करण्याकरीता सेवाभावी दृष्टीकोनातून पर्यावरण जनजागृती फलकांच्या माध्यमातून पर्यावरण विषयक जागृती होणेकरीता प्रचार व प्रसार करण्याकरीता या दोन्ही संस्थांना परवानगी देण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. अध्यक्षा पवार यमुनाताई रमणनाना यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
[ पवार यमुनाताई रमणनाना ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

प्रति,
सर्व संबंधित

प्रशासन अधिकारी
सभाशाखा, ब प्रभाग समिती
पि.चिं.मनपा, चिंचवड-३३

क्र. एएमसी/बप्र२/कावि/२६५/२०१३, दि.१२/०८/२०१३